REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# बेरोजगारी एक आव्हान



**बोडके शितल लहू**
**संशोधक विद्यार्थी स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.**

**सारांश**

भारत देशासमोरील बेरोजगारी ही समस्या भयानक आहे, ती वाढण्यासाठी लोकसंख्यावाढ, अज्ञान, व्यावसायिक शिक्षणाचा अभार जमिनीचे कमी क्षेत्र इ. अनेक घअक कारणाीभूत आहेत, पण या समस्येशी दोन हात करणे गरजेचे आहे त्यावर शासन उपाययोजना करत आहे, यामध्य राष्ट्रीय पंतप्रधान रोजगार हमी योजना, प्रोढांना व्यावसायिक प्रशिक्षण इ. योजना राबवत आहे.

## प्रस्तावना

भारत हा कृषीप्रधान देश आहे, म्हणून ओळखले जाते, या कृषीप्रधान मानल्या जाणाऱ्या देशात काम करण्याची इच्छा असतना सुध्दा काम मिळत नाही, अशी गंभीर समस्या निर्माण झाली आहे. भरतामध्ये बेरोजगारी मोठया प्रमाणात भेडसावणारी समस्या आहे, या बरोजगारीपणाचे प्रमाण हे ग्रामीण भागात जास्त असल्ल्याचे आढळून येत आहे. लोकसंख्यावाढ ही बेरोजगारीला आमंत्रण देत आहे, देशाचा विकास घडवून आणयचा असेल तर बेरोजगारीला सामोरे गेले पाहिजे व तिच्यावर आपण वचक बसवणे काळाची गरज आहे.

## व्याख्या

१) ज्या लोकांची शारीरीक आणि मानसिक दृष्टीने काम करण्याची इच्छा असतानही काम न मिळणे म्हणजे बेरोजगार होय.
२) काम करण्यासाठी राजी असताना कम मिळत नसल्याच्या क्रियेला बेरोजगार असे म्हणतात.
३) ज्या व्यक्तीला प्रचलित वेतनदारास काम करण्याची इच्छा आणि क्षमता असून देखील रोजगार मिळत नाही म्हणजे बेरोजगार होय.

बेरोजगारी आजच्या काळातील सर्वात मेठी समस्या म्हणून भारतीय समाजासमोर उभी आहे, भारत हा कृषीप्रधान देश आहे, म्हणजे भारतातल ७०% लोक आपली उपजीविका शेती करून भागवतात, पण शेतीचे मोठया प्रमाणात तुकडीकरण झाल्यामुळे मोठया प्रमाणात लोकांची उपजिविका, तसेच त्याच्या मूलभूत गरजा भागवणे कठीण झाले आहे, याला अनेक घटक कारणीभूत आहेत.

## बेरोजगारीचे कारणे

### १) लोकसंख्या वाढ

लोकसंख्या वाढ ही भारतास मोरील सर्वात मोठी समस्या आहे, भारताचे क्षेत्रफळ कमी तर लोकसंख्या जास्त असल्यामुळे सगळयांच्याच गरजा भागवणे कठीण होत आहे.

### २) दारिद्रय

दारिद्रय आणि बेरोजगारी हया एका नाण्याच्या दोन बाजू आहेत, दारिद्रय असल्यामुळे शेतीशिवाय अन्य व्यवसाय करायला भांडवल नसत, त्यामुळे बेरोजगारीला सामोरे जावे लागते.

### ३) शेतीचे हंगामी स्वरूप

भारत हा कृषीप्रधन देश आहे, त्यामुळे ७०% लोक शेतीवर आपला उदरनिर्वाह करत असतात, पण शेतातील रोजगार हंगामी स्वरूपात उपलब्ध असतो, हंगाम संपला कि शेतीतील रोजगाराला पूर्णविराम मिळतो, फक्त रब्बी आणि खरीप हंगामातच शेतीत रोजगार मिळतो नंतर शेतीमध्ये काम मिळत नही.

### ४) शेतीचे वाढते विभाजन

भारत हा लोकसंख्येने दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे, वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीचे मोठया प्रमाणात तुकडीकरण झाले आहे या तुकडीकरणामुळे शेतीतील उत्पादनात घट झाली आहे व याचा सर्व भार शेतीवर पडत आहे.

LBP PUBLICATION

**५) तांत्रिक व व्यवसायिक शिक्षणाचा अभाव**

भारत कृषीप्रधान देश असला तरी सर्वांनी जर शेती करायची म्हटले तर देशाचाही विकास होणार नाही आणि बेराजगारीची समस्या निर्माण होईल पण ही परिस्थिती सध्या आपल्या देशात निर्माण झाली आहे याचे महत्त्वाचे कारण तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाचा अभाव आहे. जर भारतीय तरूणांना तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण दिले तर ते स्वतंत्रपणे एखादा व्यवसाय करू शकतात.

**६) ग्रामीण उद्योगाचा अभाव**

उद्योगांचे केंद्रीकरण मोठया प्रमाणात शहरी भागात झाले आहे, त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना पूर्णतःच शेतीवर अवलंबून रहावे लागते आणि बेरोजगारीला सामोरे जावे लागत आहेत.

अशा प्रकारे बेरोजगारीच्या समस्या आहेत.

## बेरोजगारी कमी करण्यासाठी उपाययोजना

बेरोजगारी आजच्या काळाची एक भयावह समस्या झाली आणि तिच्यावर नियंत्रण आणणे हे अत्यंत आवश्यक आहे, त्यासाठी बेरोजगारी नियंत्रणासाठी खालील उपाय सूचवले आहेत.

**१) लोकसंख्येवर नियंत्रण**

लोकसंख्यावाढ ही मोठी समस्या बनली आहे, लोकसंख्येवर नियंत्रण ठेवले तर बेरोजगारीला आळा घालता येईल लोकसंख्या नैसर्गिक साधनसंपत्तीवरही भार पडत आहे, त्यामुळे लोकसंख्यावाढीवर नियंत्रण आणणे गरजेचे आहे.

**२) ग्रामीण औद्योगिकरण**

ग्रामीण भागात रोजगार शेतीव्यवसायातूनच मिळतात, पण शेतीचे हंगामी स्वरूप असल्यामुळे हंगाम संपल्यावरच तेथील लोकांना काम मिळत नाहीत, त्यामुळे शासनाने ग्रामीण भागातही उद्योगधंदयाना चालना दयावी, मुबलक प्रमाणात ग्रामीण लोकांना उद्योगधंदयासाठी कर्ज उपलब्ध करून दयावेत.

**३) जलसिंचनावर भर**

भारतात मोठया प्रमाणात कोरडवाहू शेती केली जाते, त्यामुळे उत्पादन कमी मिळते, जर जलसिंचनावर भर दिला, शेतीसाठी विहीरी, कुपनलिका काढून दिल्या तर शेतीसाठी पाण्याचा उपयोग होईल आणि शेतीत रोजगार मिळेल व शेतीतील उत्पादनातही वाढ होईल.

**४) प्रौढांसाठी व्यावसायिक शिक्षण**

भारतात जास्त लोकसंख्येचा देश आहे, त्यामुळे त्या ठिकाणी प्रौढ वर्ग जास्त आहे, तर त्यांना व्यवसाय करता यावा विशेष व्यावसायिक शिक्षण देणे आवश्यक आहे, व्यवसाय वाढीमुळे बेरोजगारीला आळा घालता येईल.

**५) रोजगाराभिमुख कार्यक्रम राबवणे**

**६) पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे**

बेरोजगारी जर खरच थांबवायची असेल तर वरील दिलेल्या सर्व उपायांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

## संदर्भग्रंथ

Rural Sociology :- Prof. Paurnima Bate
Rural & Urban Community :- Dr. R. B.Kolhe

LBP PUBLICATION